न्यायालयानं केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेला दिले आहेत. या प्रकरणाच्या तपासाच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला दिला आहे. हे दोन्ही अहवाल बुधवारी संध्याकाळपर्यंत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नीटची फेरपरीक्षा घ्यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह एकूण ३८ याचिकांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. फेरपरीक्षा घेणं हा शेवटचा पर्याय असला पाहिजे, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणावरची पुढील सुनावणी येत्या गुरुवारी होणार आहे.

**<><><><><>**

महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या काळात रजा देण्यासंदर्भात राज्यं आणि इतर संबंधित संस्थांशी चर्चा करून एक धोरण तयार करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. महिला कल्याण मंत्रालयानं यासंदर्भात संबंधितांशी बैठका घ्याव्यात आणि यासंदर्भात धोरण तयार करण्याचा विचार करावा, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठानं मंत्रालयाला दिले आणि हा मुद्दा धोरणात्मक असून न्यायालयानं त्यात लक्ष घालण्याचं कारण नाही, असं स्पष्ट करत यासंदर्भातली जनहित याचिका फेटाळली.

**<><><><><>**

खरीप पिकांच्या लागवडीच्या क्षेत्रात यंदाच्या हंगामात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४७ लाख हेक्टरनं वाढ झाली आहे. खरीप लागवडीखालचं क्षेत्र गेल्या वर्षी ३३१ लाख हेक्टर इतकं होतं, यंदा ते वाढून ३७८ हेक्टर इतकं झालं आहे. यापैकी ६० लाख हेक्टर क्षेत्रावर भाताची, तर ३६ लाख हेक्टर क्षेत्रात डाळींची लागवड

करण्यात आली असल्याचं कृषी मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीत दिसत आहे.

<><><><><>

काश्मीरमधे दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहीद झालेले अकोला जिल्ह्यातल्या मोरगाव भाकरे इथले सैनिक प्रवीण प्रभाकर जंजाळ यांचं पार्थिव आज सकाळी अकोला इथं आणलं, तेव्हा अशोक वाटिका इथं त्यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांचं मोरगाव भाकरे इथं आणलं. तिथं सैन्य दलानं रायफलमधून गोळ्यांच्या फैरी झाडत त्यांना सलामी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी प्रशासनाच्या वतीनं प्रवीण जंजाळ भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी अकोला जिल्ह्यातले आजी-माजी सैनिक, तसंच पोलीस आणि जिल्हा प्रशासनातले वरीष्ठ अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

<><><><><>

अरुणाचल प्रदेश आणि नागालँडसह देशाच्या ईशान्य भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मध्य भारताच्या बहुतांश भागातही आज जोरदार पाऊस पडेल. तर पूर्व भागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज आहे. विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस होईल.

